

### पीक संरक्षण

बाजरी पिकामध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळल्यास त्यांच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% या प्रमाणात फवारावे.

### कापणी

हिरव्या चाऱ्याचे भरपूर उत्पादन व अधिक पोषणमूल्ये मिळण्याच्या दृष्टीने बाजरीचे कणीस बाहेर पडल्यानंतर कापणी करणे अधिक फायद्याचे ठरते. परंतु कापणीचे काम, पिक ५०% फुलोरा या अवस्थेपलीकडे लांबणीवर टाकू नये. ही अवस्था साधारणपणे पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी येते. दुसरी कापणी घ्यावयाची असल्यास प्रथम कापणी नंतर बाजरी खोडव्याची वाढ जमिनीत उपलब्ध ओलाव्यावर अवलंबून असते व त्यानुसार दोन ते तीन खोडवे घेता येतात.

### उत्पादन

बाजरीपासुन ६० ते ६५ दिवसात हेक्टरी ४०० ते ४५० क्विंटल हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

### पोषण मूल्ये

५०% फुलोऱ्यात पीक असतांना बाजरीच्या हिरव्या चाऱ्यात शुष्कांशावर आधारीत ७ ते ९% प्रथिने, २४.९% काष्टमय तंतु, १.९% स्निग्ध पदार्थ, ८.२% खनिज पदार्थ व ५७.९% कार्बोदके (पिष्टमय पदार्थ) असतात.

## चाऱ्यासाठी जायंट बाजरा पेरा

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
गतिमान वैरण विकास कार्यक्रम (२०११-१२)
राष्ट्रीय कृषि विकास योजना

**प्रकाशक**

**डॉ. रावसाहेब भारूड**
प्रमुख
वनस्पतीशास्त्र विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी

**लेखक**

**डॉ. आण्णासाहेब बा. तांबे**
**प्रा. सर्फराज ह. पठाण**
**प्रा. शिवाजीराव ब दमामे**
**प्रा. अजित ह. सोनोने**

**संपादक**

**डॉ. हरी मोरे**
संचालक, विस्तार शिक्षण, म.फु.कृ.वि, राहुरी

**सहसंपादक**

**डॉ.मिलींद अहिरे**
प्रसारण केंद्र, म.फु.कृ.वि, राहुरी

**संपर्क**

**चारा पैदासकार**
अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्प
म.फु.कृ.वि., राहुरी - ४१३ ७२२
☎ बियाणे विभाग - ०२४२६ - २४३ ३५५

प्रति -२०००

म.फु.कृ.वि/विस्तार शिक्षण/प्रकाशन क्र.७९३/मार्च २०१२

# चाऱ्यासाठी जायंट बाजरा पेरा



अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन प्रकल्प
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी - ४१३ ७२२

Scanned by CamScanner

# चाऱ्यासाठी जायंट बाजरा पेरा

बाजरी उंच वाढणारे तृणधान्य वर्गातील महत्वाचे चारा पिक आहे. बाजरीच्या एका रोपास सरासरी ५ ते ६ कार्यक्षम फुटवे (ज्यांना कणसे येतात) आणि ४ ते ५ अकार्यक्षम फुटवे (ज्यांना कणसे येत नाहीत असे) असतात. बाजरीची वाढ जलद होत असल्यामुळे अल्पकाळात भरपूर हिरवा चारा मिळतो. हे पीक चारा टंचाईच्या काळात फुलावर येण्यापूर्वी देखील जनावरांना खाऊ घातले तरी ज्वारी प्रमाणे कोणताही धोका निर्माण होत नाही. बाजरीचे पीक हिरवा चारा, वाळलेली वैरण अथवा मूरघास म्हणून देखील उपयुक्त ठरते. पहिल्या कापणीनंतर विशेषतः खरीप हंगामात ओलीताची सोय असल्यास दोन ते तीन खोडवे सहज घेता येतात. चाऱ्यासाठी बाजरीचे पीक चवळी बरोबर आंतरपीक (२:२) म्हणूनही घेतले जाते.

## जमीन व हवामान

बाजरीचे पीक सर्व प्रकारच्या जमिनीत येऊ शकते. तथापि हलकी ते मध्यम मगदुराची व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन या पिकाच्या उत्तम वाढीस उपयुक्त ठरते. बाजरीस उबदार हवामान चांगले मानवते. बेताचा पाऊस पडणाऱ्या भागात देखील हे चारा पीक चांगले येते.

## पूर्व मशागत

पेरणीपूर्वी एक खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. त्यामुळे पिकाची वाढ जोमाने होते. पुर्वीच्या पिकाची धसकटे, काडया, पालापाचोळा वेचून जमीन पेरणीसाठी तयार करून ठेवावी.

## बियाणे व पेरणी

हिरव्या चाऱ्यासाठी बाजरी खरीप व उन्हाळी हंगामात पेरावी. खरीप हंगामातील पेरणी १५ जून व नंतर १५ जुलै आणि उन्हाळी हंगामातील पेरणी फेब्रुवारी–मार्च महिन्यात करावी. हिरव्या चाऱ्यासाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरून पेरणी पाभरीने ३० से.मी. अंतरावर करावी.

## सुधारित वाण

भरपूर हिरवा चारा उत्पादनासाठी प्रसारित झालेले सुधारित वाण : जायंट बाजरा, बायफ बाजरा व राजको बाजरा पेरणीसाठी निवडावेत.



## खत व्यवस्थापन

पेरणीपूर्वी जमिनीची मशागत करताना हेक्टरी ५ टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे.

भर खतामुळे जमिनीत ओलावा टिकून राहतो. हवा खेळती राहते. शिवाय पोषणमुल्यांचा पुरवठा चांगला होतो. बाजरीचे पीक तृण धान्य वर्गातील असल्याने नत्र खतास चांगला प्रतिसाद देते. या चारा पिकाव्दारे अल्पावधीत भरपूर उत्पादन अपेक्षित असल्याने पेरणीच्या वेळी पिकास हेक्टरी ४५ किलो नत्र (९८ किलो युरिया), ४० किलो स्फुरद (२५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ३० किलो पालाश (५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी नत्राचा ४५ किलोचा दुसरा हप्ता (९८ किलो युरिया) द्यावा. तसेच जिरायती चारा पिकास पेरणीच्या वेळी हेक्टरी ३० किलो नत्र (६५ किलो युरिया), ३० किलो स्फुरद (१८८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ३० किलो पालाश (५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे व पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी नत्राचा ३० किलोचा दुसरा हप्ता (६५ किलो युरिया) द्यावा.

## आंतर मशागत

बाजरी पिकाची उत्तम मशागत व योग्य लागवड तंत्र यांचा अवलंब केल्यास शेतात तण माजत नाही. पिकाची वाढ जलद होत असल्याने अगदी सुरवातीच्या काळात वापसा असताना साधारणतः पेरणीनंतर २० ते २१ दिवसांनी एक हात कोळपणी करावी व पेरणी २५ ते ३० दिवसांनी एक खुरपणी करून शेत तणविरहीत करावे. पुढे पिकाच्या जलद वाढीमुळे तणांचा जोर कमी होतो.

## पाणी व्यवस्थापन

बाजरी पिकास खरीप हंगामात आवश्यकतेनुसार १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. तर उन्हाळी हंगामात साधारणतः ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या देणे गरजेचे आहे. उन्हाळी बाजरीची पाण्याची एकूण गरज ४० ते ५० से.मी. प्रति हेक्टरी असते.

खरीप हंगामात ''जायंट बाजरा'' हा सुधारित वाण चाऱ्यासाठी घेतल्यास पाण्याच्या दोन पाळ्या द्याव्यात. पहिली पाण्याची पाळी पेरणीपासून १५ ते २० दिवसांनी (फुटवे फुटण्याच्या अवस्थेत ७५ मि.मी. पाण्याचे बाष्पीभवन झाल्यावर) द्यावी. दुसरी पाण्याची पाळी पेरणीपासून ३५ ते ४० दिवसांनी (पिक पोटरीत असताना) द्यावी.



Scanned by CamScanner